# जतन करण्यासाठी आशीर्वाद

*~ गुरुमाई चिद्विलासानंद*

*‘मंदिरात राहा’ सत्संग*

*शनिवार, २७ जून, २०२०*

जीवन हे जगण्यासाठी आहे.
अज्ञानात जगणे
किंवा ज्ञानसंपन्नतेने जगणे
तुमच्या जीवनाला आज आणि सदैव परिभाषित करते.

जीवनात उद्दिष्ट असायलाच हवे.
उद्दिष्टाचे मानसचित्रण करणे
आणि ते कार्यान्वित करणे आवश्यक आहे,
जेणेकरून तुम्ही तुमचे भाग्य फलद्रूप करू शकाल.

जीवन हे परमेश्वराकडून प्राप्त झालेला प्रसाद आहे.
परमेश्वर करुणामय आहे.
सर्वांमध्ये विद्यमान असलेल्या दिव्य प्रकाशाच्या रूपात
परमेश्वराचे दर्शन केले पाहिजे.

जीवन मधुर आहे आणि जीवन कटू आहे.
माधुर्य आणि कटुता हे दोन्हीही,
मनुष्यांद्वारे केल्या गेलेल्या कर्मांच्या
जटिल ताण्या-बाण्यात विणले गेले आहेत.

जीवन सुंदर आहे आणि जीवन कुरूप आहे.
सुंदरता आणि कुरूपता हे दोन परिणाम आहेत,

या गोष्टीचे की, तुम्ही कशा प्रकारे
जीवनाच्या पर्वतांना आणि त्याच्या दऱ्यांना,
नद्यांना आणि कालव्यांना,
सागरांना आणि डबक्यांना पार करण्याचा निर्णय घेता.

जीवन साधे आहे आणि जीवन गुंतागुंतीचे आहे.
साधेपणा आणि गुंतागुंत
मानसिक संकल्प-विकल्पांची निष्पत्ती आहेत
जे सहजतेने श्वासोच्छ्वास घेऊ देतात
अथवा परिश्रमपूर्वक घेतलेल्या श्वासोच्छ्वासाचा अनुभव करवतात.

जीवन निष्पक्ष आहे.
पण मग, हे ब्रह्मांड किती प्राचीन आहे.
तुम्हाला भूत, वर्तमान आणि भविष्यासमवेत समन्वय साधावा लागेल
या सर्वांच्या वर राहून,
तुम्ही तरंगत कसे राहावे, हे शिकून
आणि भरारी घेण्याचे धाडस करून.

जीवन हे भगवंताचे औदार्य दर्शवण्याचा एक मार्ग आहे.
निमिषार्धात, जर कोणी,
तुमच्याकडे पाठ फिरवली,
तर तुम्हीदेखील गिरक्या घेत,
मुक्तपणे नृत्य करत
त्यांना उल्हसित करू शकता.

जीवन दिव्य आहे आणि जीवन महिमाशाली आहे.
दिव्यता आणि महिमा त्या जीवनात अंतर्भूत आहेत
जे आपला आवाज स्वर्गापर्यंत पोहोचवते,
आणि या पृथ्वीवरील भुकेलेल्या मुखांना घास भरवते.

जीवन दयाळू आहे आणि जीवन कृपेने पूरित आहे.
जेव्हा मनुष्यांना एकमेकांविषयीच्या आपल्या घनिष्ठतेत
आणि परस्परांविषयीच्या आदरभावात
प्रकाश आणि सत्याची वाणी गवसते, तेव्हा
दयाळूपणा आणि कृपा हातात हात घेऊन नृत्य करतात.

जीवन "ईश्वर की साधना"साठी समर्पित आहे,
ईश्वराला प्राप्त करण्याची साधना.
साधना गुरूंकडून प्राप्त एक सुंदर उपहार आहे,
एक असा उपहार जो तुमचे अवधान
पुन्हा त्याकडे वळवतो, जे एक परितृप्त किस्मत जगण्यासाठी
सर्वाधिक हितकारक आहे.

जीवन गुरूंच्या प्रेमाने प्रकाशमान आहे.
म्हणून, आपले मन, हृदय आणि आत्मा यांच्याविषयी जागरूक व्हा.
दिव्य प्रकाशाने परिपूर्ण, ते तेजस्वीपणे झगमगत असतात.

आपल्या जीवनाशी मैत्री करा.
हे जग मृत्यूला अधिकच जवळ करत चालले आहे,
त्याचा अधिकच स्वीकार करते आहे.

लोकांना याचा विसर पडत चालला आहे की, जगणे ही एक कला आहे,
आणि याचा की, जगणे म्हणजे
त्या कल्याणकारी शक्तीच्या सेवेत जगणे जिच्यावर त्यांचा विश्वास आहे—
त्यांच्यासाठी भगवंत, ज्यांचा भगवंतावर विश्वास आहे,
त्यांच्यासाठी निसर्ग, ज्यांचा निसर्गावर विश्वास आहे,
त्यांच्यासाठी मानवता,
ज्यांचा जगाच्या क्षेमकुशलतेमध्ये विश्वास आहे.

© २०२० एस. वाय. डी. ए. फाउंडेशन®. सर्वाधिकार सुरक्षित.